आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र. १९५

(जेल प्रशासनाने आरोपीस अद्याप कोर्टासमोर आज हजर केलेले नाही. आरोपीतर्फे वकील हजर असुन त्यांनी आरोपीच्या गैरहजेरीत पुरावा नोंदवण्यास त्यांची हरकत नसल्याचे सांगितले. सबब साक्षीदाराचा पुरावा नोंदवण्यात येत आहे).

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१८ यांचा पुरावा**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

माझे नांव– आनंद रविशंकर रंगारी

वय – ४४ वर्षे, व्यवसाय– नोकरी (सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा बेलवंडी, शाखा प्रबंधक)

सध्या रा. बेलवंडी, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर

**सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस.पटेकर यांचेमार्फत**–

सेंट्रल बँक ऑफ इंडीया, वडझीरे शाखेमध्ये मी शाखा प्रबंधक म्हणुन मी दि.१२.४.२०२२ ते २७.४.२०२५ पावेतो कार्यरत होतो. त्यावेळी क्षेत्रीय प्रबंधक अहमदनगर शाखा याचे पंडा साहेब हे होते. पंडा साहेबांनी आमच्या वडझीरे शाखेत फसवणक झाल्याबाबत पारनेर पो.स्टे.ला फिर्याद नोंदवली होती. गुन्हयाचे तपासासंदर्भात तपास करण्यासाठी पोलीस अधिकारी काळे हे वडझीरे शाखेत आले होते. त्यांनी माझ्याकडे मुळ कागदपत्र मागण्याबाबत पत्रव्यवहार केला होता. मी तपासी अधिकारी काळे यांना ४ कागदपत्रे दिले होते. त्यापैकी तिकोणे, मोरे व पवार यांची प्रत्येकी १ एफडी पावती व पवार यांची १ विथड्रॉवल पावती मी दिली होती. तिकोणी व मोरे यांची प्रत्येकी ३,५०,०००/– रुपयांची एफडी पावती होती व पवार यांची ९,२२,०००/– रुपयांची एफडी पावती होती. मी त्या पावत्या पोलीसांना समक्ष काढुन दिल्या होत्या. आता मला नि.४३ वरील तुकाराम तिकोणे यांची पावती क्र.११२२२० खाते क्र.३७९०८७६७७८, नि.५२ वरील सुखदेव पवारयांची पावती क्र.११२२१२ खाते क्र.३७९०८७६७७८ आणि नि.४७ वरील रंजना मोरे यांची पावती क्र.११२२७६ खाते क्र.३८०५६७३४४८ या पावत्या दाखवण्यात आल्या. त्या पावत्या मी पोलीसांना समक्ष काढुन दिल्या होत्या व पोलीसांनी त्या जप्त केल्या होत्या. त्यासंदर्भात पारनेर पोलीसांनी माझा जबाब दि.१८.११.२०२२ रोजी माझ्या सांगण्याप्रमाणे घेतला होता. गौतम जाधव यांना मी पाहील्यास ओळखु

शकतो कारण यापुर्वी मी त्यांना केससंदर्भात कोर्टात पाहीले होते. आता आरोपी न्यायालयात हजर नाही.

**<u>उलटतपास आरोपीकरीता विधीज्ञ श्री.ए.पी.रोकडे यांच्यामार्फतः</u>**

मी १६ वषापासुन सेंट्रल बँकेत नोकरीस आहे. वडझीरे शाखेत येण्यापुर्वी मी सेंट्रल बँक एन आय बी एम कोंढवा, पुणे शाखेत होतो. हे म्हणणे खरे आहे की पारनेर तालुक्यातील सेंट्रल बँकमधील काही कर्मचा–यांशी माझी ब–यापैकी ओळख आहे. मी वडझीरे शाखेचा शाखाधिकारी म्हणुन कार्यभार समीत बोराडे यांचेकडुन घेतला होता. कागदपत्रे जप्त करण्याचे पंचनामे पो.स्टे.ला झाले होते व त्यावेळी मी पो.स्टे.ला हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की त्या पंचनाम्यांवेळी समीत बोराडे यांना पंच म्हणुन बोलावले होते. हे म्हणणे खरे आहे की मी बोराडेकडून चार्ज घेताना बँकेचे सर्व रेकॉर्ड तपासुन चार्ज घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की अपहार सोडुन बाकीचे सर्व रेकॉर्ड क्लीअर होते. हे म्हणणे खरे आहे की मी चार्ज घेण्यापुर्वी बँकेने अपहाराचे रेकॉर्ड वेगळे काढुन ठेवले होते. वडझीरे शाखेत मी शाखाधिकारी म्हणुन येण्यापुर्वी अपहाराबाबत कल्पना होती. हे म्हणणे खरे आहे की वडझीरे शाखेत अपहार झाला असताना जबाबदार अधिकारी म्हणुन माझी शाखाधिकारी म्हणुन नियुक्ती केली होती. हे म्हणणे खरे आहे की जप्ती पंचनामे संदर्भात व पोलीसांकडे साक्ष देण्यासंदर्भात मला हेड ऑफीसने मार्गदर्शन केले होते. हे म्हणणे खरे आहे की वडझीरे शाखेत अपहार झाला असताना मी चार्ज घेताना रेकॉर्ड तपासुन काळजीपुर्वक चार्ज घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की मी चार्ज घेताना एफडी पावत्यांचा हिशेब सोडुन बाकी सर्व पावत्यांचा हिशेब बरोबर होता. मी वडझीरे शाखेचा शाखाधिकारी होताना माझी रिजनल मॅनेजर प्रिती सारस्वत यांनी माझी नियुक्ती केली होती. आता मला नि.४३ वरील तिकोणे व नि.५२ वरील पवार यांच्या एफडीच्या पावत्या दाखवण्यात आल्या.

प्रश्न– नि.४३ व नि.५२ वरील एफडीच्या पावत्या तुमच्याच बँकेच्या आहेत का व त्या ख–या की खोटया आहेत?

उत्तर– दोन्ही पावत्या आमच्या बँकेच्या असुन त्या ख–या आहेत.

प्रश्न– त्या दोन्ही पावत्यांमधील मजकुर खरा आहे का?

उत्तर– त्यातील नमुद केलेले खाते क्रमांक चुकीचे आहेत व त्यात नमुद रक्कम बरोबर आहे.

हे म्हणणे खरे नाही की तुकाराम तिकोणे व सुखदेव पवार यांचे खाते क्रमांक एकच आहे.

प्रश्न– दोन्ही व्यक्तींचे खाते क्रमांक एकच असल्याबाबत तुम्ही रिजनल ऑफीसमध्ये सांगितले होते का?

उत्तर– दोन्ही व्यक्तींचे खाते क्रमांक एकच असल्याबाबत मी रिजनल ऑफीसमध्ये सांगितले नव्हते.

मी पोलीसांनाजबाब देतेवेळी दोन्ही व्यक्तीचे खाते क्रमांक एकच असल्याबाबत सांगितले नव्हते. तिकोणे व पवार यांचे खाते क्रमांक एकच का आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. दि.१८.११.२०२२ रोजी माझा पोलीस अधिकारी वाघ यांनी सायंकाळी ४ ते ५ च्या दरम्यान जबाब घेतला असेल. दि.१८.११.२०२२ रोजी मी जे कागदपत्र दिले त्याबाबत पंचनामा पोलीस स्टेशनला झाला होता. पोलीसांनी दि.१८.११.२०२२ रोजी अगोदर पंचनामा केला व त्यानंतर माझा जबाब घेतला. मी शाखाधिकारी असताना वडझीरे शाखेत कागदपत्रांचा शोध पंचनामा झाला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की जप्ती पंचनामा, माझा जबाब व शोध पंचनामा पो.स्टे.ला झाला होता.

प्रश्न– पंचनामे बँकेत झाले नव्हते व ते पोलीस स्टेशनला झाले होते व पोलीस बँकेत आले नव्हते?

उत्तर– फक्त पोलीस अधिकारी हे बँकेत पत्र घेवुन आले होते.

पोलीस अधिकारी वाघयांनी घनशाम औटी यांच्याशी माझी ओळख करुन दिली असे काही घडले नाही. घनशाम औटी माझ्याकडे बँकेत रोजगारवर कामास नव्हता.

प्रश्न– तुम्ही पोलीसकाळे यांना पत्राद्वारे मागितलेली माहीती त्यांना वेळेत दिली नाही?

उत्तर– पत्रात वेळेबाबत नमुद नव्हते व त्याबाबत मला आठवत नाही.

हे म्हणणे खरे आहे की मागितलेली माहीती घेवुन मी दि.१८.११.२०२२

रोजी पोलीस स्टेशनला गेलो होतो. हे मला आठवत नाही की नि.४३, ४७ व ५२ वरील पावत्यां व्यतिरीक्त इतर महत्वाची माहीती काही मागितली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की पोलीस काळे यांनी पत्राद्वारे जेवढी माहीती मागितली तेवढी माहीती मी दिली होती.

(जेल प्रशासनाने आरोपीस १.२५ वाजता हजर केले.)

हे म्हणणे खरे आहे की मी सादर केलेली कागदपत्रे बनावट आहेत की खरी आहेत याबाबत मला माहीती नाही कारण अपहार झाल्यानंतर माझी बँकेतुन बदली झाली होती. मी वडझीरे शाखेत आल्यावर विद्या उघडे, बोराडे व सोनाली जाधव त्या शाखेत कार्यरत नव्हते. मी ऑडीट रिपोर्ट पाहीला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की ज्या खातेदारांचे पैसे बुडाले होते त्यांचे पैसे मी शाखाधिकारी असताना त्यांना परत मिळाले होते. हे मला सांगता येणार नाही की नि.४३, ४७ व ५३ वरील एफडी पावत्यांवर बँकेच्या प्राधिकृत अधिकारी म्हणुन सहया होत्या किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की दि.१.१२.२०२२ व दि.२.१२.२०२२ रोजीच्या जप्ती पंचनाम्यांवर माझी सही आहे व मी सादर केलेली कागदपत्रे पो.स्टे.ला मी स्वतः नेवुन दिली होती. आता मला नि.७२ व ७३ वरील दि.१८.११.२०२२ रोजीचे मालमत्ता शोध व जप्ती पंचनामे दाखवण्यात आले. ते दोन्ही पंचनामे माझ्या कार्यकाळात झाले होते. हे म्हणणे खरे आहे की नि.७२ व ७३ वरील पंचनाम्यामधील एकुण ४ कागदपत्रे मी पो.स्टे.ला घेवुन जावुन पोलीसांना दिले होते. हे म्हणणे खरे आहे की त्या दोन्ही पंचनाम्यामधील जप्तीची कार्यवाही पो.स्टे.ला झाली होती. हे म्हणणे खरे आहे की दि.१.१२.२०२२ व २.१२.२०२२ रोजी झालेल्या पंचनाम्यांवेळी मी व बँकेतील स्टाफ दिपक ढवण व समीत बोराडे हजर होते. हे म्हणणे खरे आहे की दि.१.१२.२०२२ रोजीच्या पंचनाम्यांतील २१ कागदपत्रे मी पो.स्टे.ला घेवुन गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की दि.१.१२.२०२२ व २.१२.२०२२ रोजीच्या पंचनाम्यातील कागदपत्रे पोलीसांनी काढले नव्हते, ते मी स्वतः काढुन पो.स्टे.ला गेलो होतो. नि.७२ व ७३ वरील पंचनाम्यातील कागदपत्रे पोलीसांनी पो.स्टे.मध्ये जमा करुन घेतले होते. हे माझ्या लक्षात नाही की पोलीसांनी जमा केलेली कागदपत्रे मुद्देमाल रुममध्ये ठेवायचे आहेत असे काही मला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की बँक कर्मचा-यांना वाचवण्यासाठी मी खोटा जबाब दिला होता व खोटे पंचनामे

केले होते.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(डॉ. एन.एस.सबनीस)

दिनांकः २७/१०/२०२५. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,

पारनेर.